**दि कल्याण जनता सहकारी बँक लि.** (शेडयुल्ड बँक)

## <u>विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त</u>

शनिवार दिनांक १३.०४.२०१३ रोजी बँकेची विशेष सर्वसाधारण सभा महावीर हॉल, आग्रा रोड, कल्याण (प.) येथे दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यात आली होती.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल ना. खिरवडकर यांनी ठीक ३.३० वाजता सभेसाठी आवश्यक तेवढी गणसंख्या असल्याचे जाहीर केले. सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली. मा. अध्यक्ष, श्री. मोहन श्री. आघारकर हे सभेसमोर विषय मांडतील, असे सांगितले.

मा. अध्यक्ष श्री. मोहन श्री. आघारकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन विशेष सर्वसाधारण सभेचे प्रयोजन सर्व सभासदांस सांगून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील घडामोडींचा आढावा घेतला. बँकेने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात ₹ १३०८ कोटी ठेवी जमा केल्या व ₹ ९३१ कोटी कर्जे वितरित केली. एकूण NPA ३.७५% व निव्वळ NPA ०% आहेत व बँकेने ₹ १५ कोटींचा नफा मिळवला असल्याचे सांगितले. तसेच, सदर आकडेवारी लेखापरीक्षणापूर्वीची असल्याचे त्यांनी सभेस सांगितले. यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात करतांना मा. अध्यक्षांनी आपले प्रास्ताविक केले.

केंद्र शासनाच्या ९७ व्या घटनादुरुस्तीनंतर महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या अध्यादेश क्र. २ नुसार, नागरी सहकारी बँकांसाठी तयार केलेले आदर्श उपविधी (Model Bye-laws) सभेपुढे दृक्श्राव्य माध्यमातून सविस्तरपणे मांडले.

- ९७ व्या घटना दुरुस्तीचा घटनाक्रम
- राज्यांवर असलेली जबाबदारी
- सहकार हा विषय राज्याच्या अखत्यारित असतानाही केंद्र शासनाने या संदर्भात घटनेमध्ये तरतूद करण्यामागे दिलेली कारणमिमांसा
- कलम -२ मधील अनुच्छेद २४३ झेड.एच. नुसार घटनेमधील नवीन व्याख्या
- मतदानाचा अधिकार कलम - २७ मधील महत्वाची तरतूद (अनुच्छेद २४३ झेड. ओ. २)
- क्रियाशील सभासद - कलम २९(अनुच्छेद २४३ झेड. ओ.)

- मतदानाचा अधिकार कलम - २७ मधील महत्वाची तरतूद (अनुच्छेद २४३ झेड. ओ. २)
- संचालक मंडळ कलम - ७३ अ-अ.अ समितीची रचना (अनुच्छेद २४३ झेड. जे)
- संचालक मंडळ (आरक्षण) कलम-७३(ब) मध्ये व्यवस्थापन समितीवरील राखीव जागा
- संचालकांची अपात्रता
- सहकारी संस्थांच्या निवडणुका कलम - ७३ ग. क. नुसार (अनुच्छेद २४३ झेड.के)
- लेखापरीक्षण कलम ८१ (१) (अनुच्छेद २४३ झेड.पी.)

यानंतर शासनाच्या अध्यादेशानुसार, बँकेच्या उपविधीमधील बदलांची माहिती मा. संचालक अॅड. निशिकांत बुधकर यांनी सभेस दिली. यामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अनुषंगाने बँकिंग संदर्भातील व्याख्या व बँकेचा उद्देश याबाबतची माहिती सभेस दिली. निधींचे वितरण, कर्ज उभारण्याची मर्यादा व भागभांडवल याची सविस्तर माहिती सभेस दिली.

सुधारित घटनेनुसार पुढीलप्रकारचे सभासद बँकेत असतील -

अ) सामान्य सभासद

   १) क्रियाशील सभासद

   २) अक्रियाशील सभासद

ब) नाममात्र सभासद

क) सहसभासद

बँकेच्या व्यवसायाशी समांतर व्यवसाय नसलेली तसेच, बँकेच्या कार्यक्षेत्रात राहणारी व जिच्या खात्यात किमान रक्कम ₹ ५००/- आहे आणि बँकेच्या सेवांची गरज असणाऱ्या व्यक्तीस सामान्य सभासद म्हणून स्वीकारले जाईल.

क्रियाशील सभासद होण्यासाठी सभासदाचे किमान भागभांडवल ₹ १५००/- आणि किमान ठेवी ₹ ७०००/- किंवा ₹ १,००,०००/- पर्यंत कर्ज असावे.

सामान्य सभासदत्वासाठीच्या अटी तसेच, सभासदांचे हक्क व अधिकार याबाबतची माहिती सभेस दिली. सभासदत्वाचा अर्ज व त्यावरील कार्यवाहीची प्रणाली सभेस सांगितली.

क्रियाशील सभासदांचे अधिकार तसेच, बँकेच्या निवडणूकांमध्ये मतदान करण्याचे अधिकार कशाप्रकारे असतील याची सविस्तर माहिती सभेस दिली. नाममात्र सभासद व त्यांना मिळणाऱ्या सुविधांबद्दलची माहिती सभेस देण्यात आली. **KYC** अंतर्गत सभासदांची ओळख, सभासदत्वाचा राजीनामा सभासदत्व संपुष्टात येणे इ. बद्दलची माहिती दिली. सभासदाचा मृत्यू झाल्यास त्याचा कायदेशीर प्रतिनिधी किंवा वारस यांस भागभांडवलाची रक्कम मिळेल तसेच त्यांची मालमत्ता, येणे असलेल्या रकमेपोटी २ वर्षापर्यंत बँकेच्या ताब्यात राहील. वार्षिक सर्वसाधारण सभा व या सभेची कामे व अधिकार याची विस्तृत माहिती सभेस दिली. तसेच, वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा या सभांची सूचना क्रियाशील व अक्रियाशील सभासदांना पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने पाठविली जाईल.

१) स्थानिक वाटप पद्धतीने किंवा
२) पोस्टाने
३) ई-मेलद्वारे
४) कुरिअरद्वारे
५) बँकेच्या शाखांमार्फत

यानंतर नवीन घटनेनुसार संचालक मंडळाची रचना कशी असेल याचे विस्तृत विवेचन केले. तज्ज्ञ संचालक व संचालक मंडळातील राखीव जागा याबाबत माहिती दिली. संचालक मंडळ सदस्यासाठीचे पात्रता निकष तसेच, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कार्यकालीन कालावधी, त्यांचे अधिकार व कामे आणि संचालक मंडळाचे अधिकार व कार्ये याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच, संचालक पदासाठी अपात्र होण्याची कारणेही समजावून सांगितली. संचालक मंडळ सभांसाठी आवश्यक असलेल्या गणपूर्तीची माहिती सभेस दिली. संचालक मंडळातील रिक्त जागांवर कशाप्रकारे नेमणूक करता येईल याची नवीन कायद्यानुसार लागू झालेल्या नियमांची माहिती सभेस दिली. सभासद आणि संस्था यांच्यामध्ये वेळोवेळी निर्माण होणारे वाद, तक्रारी यांचे निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण व तडजोड समितीची स्थापना करणे नवीन घटनेनुसार अनिवार्य आहे. या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून प्रतिथयश बँकर्स जो क्रियाशील सभासद असणे आवश्यक आहे. तसेच, क्रियाशील सभासदांमधून अर्थशास्त्र, सहकार, बँकिंग या विषयातील २ तज्ज्ञ व्यक्ती सदस्य म्हणून असतील.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची अधिकार व कर्तव्ये याबाबतची माहिती सभेस दिली. बँकेने ठेवी स्वीकारताना व कर्जे वितरित करतांना कोणत्या नियमांचे पालन करावे याची सविस्तर माहिती सभेस दिली. बँकिंग व्यतिरिक्त होणाऱ्या जास्तीत जास्त खर्चाची मर्यादा कशा स्वरुपात असेल, याचाही नवीन कायद्यात उल्लेख केला आहे. नफा वाटणीचे स्वरुप, भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण, निधींची गुंतवणूक, राखीव निधी व लाभांश याबद्दलची

माहिती सभेस विस्तृतपणे सांगितली. बँकेचे हिशोब, नोंदी व लेखापरीक्षण कशाप्रकारे असेल याबद्दलची माहिती सभेस सांगितली. बँकेची मोहोर (सील) कशी वापरली जाईल, पोटनियमांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास त्याबाबतची प्रणाली, सभासदांसाठी शैक्षणिक वर्ग, तसेच कर्मचाऱ्यांसाठी भविष्य निर्वाह निधी व सेवकांच्या सेवाशर्ती याचे विस्तृत विवेचन केले. जर बँकेचा कारभार गुंडाळणे आवश्यक असेल तर ती प्रक्रिया कायदा व नियम यातील तरतुदीनुसार असेल असेही सभेस सांगितले. कर्मचारी असोसिएशनचा व्यवस्थापनेच्या निर्णयप्रक्रियेमध्ये सहभाग असण्याच्या दृष्टीने बँक योग्य ते नियम तयार करु शकते असेही सांगितले. तसेच, बँक कोणत्या संस्थांची वर्गणीदार होऊ शकते याबाबतची माहिती दिली.

यानंतर काही सभासदांनी त्यांचे प्रश्न सभेपुढे मांडले. ते पुढीलप्रमाणे-

बँकेचे सभासद श्री. रामकृष्ण भिडे यांनी सभेमध्ये मुद्दा उपस्थित केला की, घटनेतील उपविधी दुरुस्तींबाबत काही सुधारणा ही सभा सुचवू शकते का? नाहीतर या बदलांस केवळ सभेची मान्यता घेतल्यासारखे होईल त्यावर चर्चा होणार नाही. तसेच, सभासदांचे अधिकार व पात्रता यापूर्वी काय होत्या व आता काय आहेत, हे कुठेही नमूद नाही. याचे निराकरण मा. संचालक ॲड. बुधकर ह्यांनी पुढीलप्रमाणे केले.

सरकारच्या नियमानुसार बँकेस स्वायत्तता मिळाली आहे. कामाच्या पद्धतीबाबत सरकारने मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. आपले अधिकार जपण्यासाठी हा कायदा तयार केलेला आहे. सरकारने सहकार क्षेत्राची दखल घेऊन सकारात्मक दृष्टीकोनातून बदल करण्याच्या हेतूने हा कायदा अस्तित्वात आणला ही सगळ्यात जमेची बाब. सभासदांना कोणते बदल मान्य करायचे आहेत, हे समजण्यासाठी आजच्या सभेचे प्रयोजन. याबाबत काहीही शंका असल्यास आपण त्या नंतर कधीही विचारु शकता. तसेच, सभासदांना प्रशिक्षण देणे कायद्यानुसार अनिवार्य आहे. यातील त्रुटींमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल.

बँकेचे सभासद श्री. फणसाळकर (सभासद क्र. ११९४३) यांनी विचारले की, संचालक होण्यासाठी शैक्षणिक व वयाची अट आहे का? यावर असे कोणतेही बंधन नसल्याचे सांगण्यात आले.

बँकेचे सभासद श्री. मधुकर किरवे (सभासद क्र. २१६२४) यांनी पुढीलप्रमाणे आपले मत मांडले. क्रियाशील सभासदाने ५ वर्षात एकदातरी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु, मोठ्या बँकांचा विचार करता त्यांचे लाखावर सभासद असून सर्वांना सभेस उपस्थित राहता येणार नाही. संचालक मंडळासाठी मतदानाचा अधिकार फक्त क्रियाशील सभासदास आहे. जे सभासद ५ वर्षात एकदाही सभेस उपस्थित राहणार नाहीत, ते आपोआप मतदानाचा अधिकार गमावतील.

सभासदाचे निधन झाल्यावर जर तो सभासद कर्जदार असेल तर त्याची मालमत्ता २ वर्षे बँकेच्या ताब्यात राहील. परंतु, सभासदाचे निधन झाले तर त्याच्या कर्जाचा वाटा संस्था उचलेल का अशी तरतूद संस्थेत आहे का? यावर उत्तर देतांना असे सांगण्यात आले की, सध्या अशा कोणत्याही प्रकारची तरतूद नाही. आपली सूचना चांगली आहे, आपण त्याचा विचार करु.

बँकेचे सभासद श्री. सुरेश नामदेव गुरव, पुणे (सभासद क्र. २२१३१) ह्यांनी पुढील प्रश्न उपस्थित केले.

१) संचालक मंडळ रचनेत २ तज्ज्ञ व कार्यकारी संचालक असावा असे घटनेत नमूद केले आहे. परंतु, नवीन रचनेत त्याचा समावेश नाही.

२) सभासदास उमेदवारी अर्ज भरावयाचा असल्यास सभासदांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

३) सभेची नोटीस सभासदांना वेळेत पाठवणे, SMS द्वारे नोटीस पाठवणे.

यावर, त्यांच्या प्रश्नांचे निरसन करताना सांगण्यात आले की, संचालक मंडळाच्या १७ जणांमध्ये तज्ज्ञ संचालक नसल्यास ते स्वीकृत करण्यात येतील. तसेच, संचालकपदासाठी प्रशिक्षण देणे बंधनकारक नाही व सभेची नोटीस सर्व पद्धतीने (SMS द्वारे सुद्धा) पाठविली जाते. परंतु सभासदांनी आपला मोबाईल नंबर बँकेकडे देणे आवश्यक आहे.

डॉ. चंद्रशेखर तांबडे (सभासद क्र. ७६४२) ह्यांनी, क्रियाशील सभासद ह्या मुद्द्यांमध्ये इंग्लिश व मराठी उपविधीमध्ये सारखी नोंद करावी असे सूचविले.

यानंतर मा. अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे ठराव मांडला.

ठराव क्र. १ : केंद्र शासनाच्या ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या अध्यादेश क्र. २ सन २०१३, दि. १४.०२.२०१३ यास अनुसरुन नागरी सहकारी बँकांसाठी तयार केलेल्या आदर्श उपविधींमध्ये सुसंगत बदल संचालक मंडळ सभेने सूचविले आहेत. सदर उपविधी दुरुस्तीचा प्रस्ताव मा. संचालक ॲड. निशिकांत पुरुषोत्तम बुधकर यांनी सभेपुढे मांडला. त्यास ही सभा मंजुरी देत आहे. सदर उपविधी सहकार आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्याचे व सदर कार्यालयाने उपविधींमध्ये सूचविलेले बदल स्वीकारण्याचे अधिकार, ही सभा संचालक मंडळास देत आहे.

सूचक : नाव : श्री. विनायक विष्णू मालसे
सभासद क्र. १७८१६

अनुमोदक : नाव : श्री. निळकंठ रघुनाथ काळे
सभासद क्र. २४९६

ठराव सर्वानुमते मंजूर.

केंद्र शासनाच्या ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या अध्यादेश क्र. २ सन २०१३ नुसार, सहकार आयुक्त कार्यालयाने सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी तयार केलेल्या लेखापरीक्षकांच्या शासन मान्य नामतालिकेमधून लेखापरीक्षकांची नेमणूक व मेहेनताना वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करणे गरजेचे आहे.

बँकेचे संचालक मा. श्री. सचिन सुधाकर आंबेकर ह्यांनी सदरबाबतचा ठराव सभेपुढे मांडला.

ठराव क्र. २ : आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता लेखापरिक्षकांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव मा. संचालक श्री. सचिन सुधाकर आंबेकर ह्यांनी सभेपुढे मांडला. आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक शासनाच्या निर्देशानुसार करण्याचा तसेच, त्यांचा मेहेनताना ठरविण्याचे अधिकार ही सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

सूचक : नाव : श्री. बाळकृष्ण शंकर खंडकर
सभासद क्र. ९०८१

अनुमोदक : नाव : श्री. गोपाळ कृष्ण भिडे
सभासद क्र. ४०३१

ठराव सर्वानुमते मंजूर.

यानंतर बँकेचे उपाध्यक्ष मा. प्रा. विलास पेणकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. सभासदांनी मौलिक सूचना केल्या त्यांचे आभार मानले. महावीर हॉलचे मालक, व्यवस्थापक, माईकची व्यवस्था करणारे मे. प्रकाश साऊंड सर्व्हिसेस, रेकॉर्डर श्री. लेले, कर्मचारी व अधिकारी यांचे आभार मानले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**मुख्य कार्यकारी अधिकारी** **अध्यक्ष**